# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग

## प्रवेश सूचना

निम्नस्तर कृषि शिक्षणांतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०२०—२०२१ ची कृषि तंत्र पदविका, मत्स्य अभियांत्रिकी पदविका व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया दिनांक ८.९.२०२० पासून ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत होती. सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये कृषी व पदमु विभागाच्या शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १५१४/प्र.क्र.१००/७ अे, दिनांक ०८.०७.२०१९ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाकरीता १२ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ९.९.२०२० रोजी सदर आरक्षणास स्थगिती दिली असल्याने याबाबत शासनामार्फत पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत सदर प्रवेश प्रक्रिया दिनांक २५.९.२०२० नंतर पुढे तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.

या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक — बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६—ब, दिनांक २४.११.२०२० अन्वये प्राप्त सूचनांचे अवलोकन करुन कृषि तंत्र पदविका, मत्स्य अभियांत्रिकी पदविका व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम सन २०२०—२०२१ प्रवेश कार्यक्रम दिनांक २७.११.२०२० पासून सुरु करण्यात येत आहे. याबाबतचे सुधारीत वेळापत्रक व शासन निर्णय विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org वर व विद्यालयांमध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

क्र.डॉ.बासाकोकृवि/निकृशि—ई/४८६/२०२०
दिनांक. 27 NOV 2020

कुलसचिव
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण
कृषि विद्यापीठ, दापोली

## कृषि तंत्र पदविका व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम

## सुधारीत प्रवेश कार्यक्रम शैक्षणिक वर्ष सन २०२०—२०२१

**(प्रवेश माहिती पुस्तिका पृष्ठ क्र. २५ वरील प्रवेश कार्यक्रम २०२०—२१ पुढील प्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.)**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रवेश अर्ज व माहिती पुस्तिका संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाचा दिनांक | ०८/०९/२०२० |
| २ | प्रवेश अर्ज व त्या सोबतची आवश्यक ती विहित प्रमाणपत्रे/कागदपत्रे व शुल्कासह संबंधीत कृषि विद्यालयात सादर करण्याचा कालावधी **(दि.८.९.२०२० ते २५.९.२०२० या कालावधीमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही)** | २७/११/२०२० ते ०४/१२/२०२० (सायं.६.०० वा. पर्यंत) |
| ३ | तात्पुरती गुणवत्ता यादी तसेच त्रूटी आलेल्या प्रवेश अर्जाची स्वतंत्र यादी संबंधीत कृषि विद्यालयांत प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | १०/१२/२०२० |
| ४ | तक्रार नोंदणीचा (प्रवेश अर्जातील त्रृटी पूर्ण करण्याची) अंतिम दिनांक | १०/१२/२०२० ते १४/१२/२०२० (सायं.६.०० वा. पर्यंत) |
| ५ | तक्रार निवारण समितीची बैठक | १६/१२/२०२० |
| ६ | विद्यालय निहाय सुधारीत अंतिम गुणवत्ता यादी संबंधीत कृषि विद्यालयांत प्रसिध्द करण्याचा दिनांक | १७/१२/२०२० |
| ७ | पहिल्या प्रवेश फेरीच्या जिल्हानिहाय वाटप यादीची प्रसिध्दी दिनांक | १८/१२/२०२० |
| ८ | संबंधित विद्यालयात मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रांसह उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | २१/१२/२०२० (सायं.६.०० वा. पर्यंत) |
| ९ | दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी संवर्ग बदलून (रूपांतरासह) | २३/१२/२०२० |
| १० | संबंधित विद्यालयात मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रांसह उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | २६/१२/२०२० (सायं.६.०० वा. पर्यंत) |
| ११ | तिसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी (जिल्हा बंदीची अट शिथिल करुन) | २९/१२/२०२० |
| १२ | संबंधित विद्यालयात मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रांसह उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | ०१/०१/२०२१ (सायं.६.०० वा. पर्यंत) |
| १३ | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ०१/०१/२०२१ |

**टिप : उपरोक्त प्रवेश कार्यक्रम संपेपर्यंत सर्व विद्यालयांची कार्यालये शनिवार व रविवार या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी चालू राहतील याची नोंद घेण्यात यावी.**

दिनांक : **27 NOV 2020**

कुलसचिव
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जिल्हा — रत्नागिरी ४१५ ७१२

# बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम
# सुधारीत प्रवेश कार्यक्रम शैक्षणिक वर्ष सन २०२०-२०२१

(प्रवेश माहिती पुस्तिका पृष्ठ क्र. १० वरील प्रवेश कार्यक्रम २०२०—२१ पुढील प्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.)

| अ.क्र. | तपशील | बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १) | माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज विद्यापीठ संकेतस्थळ व संबंधित केंद्रांत प्रसिध्द करावयाचा दिनांक | ०८/०९/२०२० |
| २) | संपूर्ण भरलेले अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख<br>(दि.८.९.२०२० ते २५.९.२०२० या कालावधीमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही) | २७/११/२०२० ते<br>०४/१२/२०२०<br>(सायं.६.०० वा. पर्यंत) |
| ३) | प्रवेशाकरिता तात्पुरती निवड झालेल्या आणि प्रतिक्षा सूचीवरील उमेदवारांची सूची वार्तांफलकावर जाहिर करणे. | ०८/१२/२०२० |
| ४) | अ) नाव नोंदणी (निवड सूचीनुसार)<br>ब) प्रतिक्षा सूचीवरील उमेदवारांची नाव नोंदणी<br>क) रिक्त जागा भरण्याची अंतिम मुदत<br>ड) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाला नोंदणी अर्जासह सादर करणे. | ११/१२/२०२०<br>१४/१२/२०२०<br>१८/१२/२०२०<br>२२/१०/२०२० |

## शैक्षणिक दिनदर्शिका २०२०-२०२१

| | | |
|---|---|---|
| १) | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | २१/१२/२०२० |
| २) | सहामाही परीक्षा | **मार्च २०२१** |
| ३) | शैक्षणिक सहली/ क्रिडा स्पर्धा | **फेब्रुवारी २०२१** |
| ४) | वार्षिक परीक्षा प्रात्यक्षिक व लेखी | **ऑगस्ट २०२१** |
| ५) | निकाल जाहीर करणे | **ऑगस्ट २०२१** |

टिप : उपरोक्त शैक्षणिक दिनदर्शिका सन २०२०—२०२१ कोविड—१९ विषाणूचा होणारा प्रादुर्भाव या परिस्थितीनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

दिनांक : 27 NOV 2020

कुलसचिव
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जिल्हा — रत्नागिरी ४१५ ७१२

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१५७३७/२०१९ वर दि.०९.०९.२०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरून सन २०२०-२१ मधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक - बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६-ब
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २५ नोव्हेंबर, २०२०

प्रस्तावना -:

महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाची आणि राज्यातील नियंत्रणा खालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दि.२७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सदरील याचिकांवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०९.२०२० रोजीच्या आदेशान्वये अंतरीम स्थगिती दिलेली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास दिलेल्या उपरोक्त अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशाबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत महाधिवक्ता,महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले कायदेशिर अभिप्राय विचारात घेऊन योग्य त्या सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.त्यानुसार शासन पुढील प्रमाणे सुचना देत आहे

शासन निर्णय :-

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०९.२०२० रोजी विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिका यामध्ये दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून संबंधित प्रशासकीय विभागांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील दि.०९.०९.२०२० नंतरची सर्व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया एसईबीसी वर्गाकरिता आरक्षण न ठेवता पार पाडावी. ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक ९ सप्टेंबर

Scanned by CamScanner

२०२० पूर्वी एईसीबीसी प्रवर्गातून प्रवेशाकरिता अर्ज केले असतील परंतु त्यांना प्रवेश देण्यात आले नसतील अशा एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावे.

३. वरील सुचना या मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांमधील निर्णयाच्या तसेच राज्य शासनाने या कामी देण्यात आलेली अंतरीम स्थगिती उठविण्याकरीता दाखल केलेल्या अर्जाच्या निर्णयाच्या अधीन राहतील.

४. हा शासन निर्णय अंतरिम स्थगिती उठविण्याच्या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत लागू राहील.

५. वरील निर्णयांची अंमलबजावणी सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी तात्काळ करावी व संबंधित विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे सादर करावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक --- असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. 202011201848461807

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र. अं. खडसे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,

१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३.प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४.प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई.
१९.मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२०.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२१.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२२.सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२३.सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.विधिमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२७. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२८. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.